माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ-०५/२०१९/ पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| पांडुरंग दत्तात्रय थिटे | कक्ष अधिकारी , यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद कार्यालय, पुणे | उप-मुख्य कार्यकारी अधिकारी, यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद कार्यालय, पुणे |

<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक- ०४- १० - २०२४</u>

तक्रारदाराने आयोगाकडे दि.१०/१/२०१९ रोजी तक्रार अर्ज केला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही, अशी तक्रार केली होती, त्यासोबत दि.२५/७/२०१८ रोजी जो माहिती अर्ज दिला होता त्याची प्रत सादर केली आहे. त्यात माहिती अर्जाच्या पोच पावती बाबतचा कोणताही पूरावा / अभिलेख आयोगाकडे सादर केले नाहीत.

सदर तक्रार अर्जामध्ये दि.२१/११/२०२३ रोजी सुनावणीचेवेळी तक्रारदार कोणतीही पूर्व सूचना न देताच गैरहजर होते, तर विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. शेखर गायकवाड व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री. धनंजय खटावकर हे उपस्थिती होते.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दि.१/१०/२०२४ रोजी ईमेलद्वारे सुचित केले की, त्यांच्या दि.२५/७/२०१८ च्या माहिती अर्जावर कोणतीही माहिती दिली नाही, म्हणून त्यांची तक्रार कायम आहे.

सुनावणीचेवेळी श्री.धनंजय खटावकर, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, (सध्या कार्यरत सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग) जिल्हा परिषद पुणे यांनी सुचित केले की, त्यांची अन्यत्र बदली झाली असल्याने या प्रकरणाबाबत संबंधित नस्तीचा शोध घेऊन उत्तर देणे शक्य होईल.

सुनावणीचेवेळी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शेखर अरविंद गायकवाड, सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांनी सुचित केले की, सदरचा माहिती अर्ज शोध घेण्याच्या अनुषंगाने कार्यालयरीन ऑनलाईन डाटाची तपासणी केली असता, माहिती अर्ज प्राप्त झाल्याबाबत कोणतीही नोंद दिसून आली नाही. तरी देखील त्याचा शोध ऑफलाईन रजिस्टर वरुन घेऊन त्यावरील कार्यवाहीबाबत आयोगाला सुचित करता येईल.

श्री.धनंजय खटावकर, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, (सध्या कार्यरत सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग) जिल्हा परिषद पुणे यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांनी १५ अर्जदाराच्य दि.२५/७/२०१८ च्या माहितीचा अर्जाचा शोध घेऊन त्यावर केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत आयोगास सादर करावा.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, (सध्या कार्यरत सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग) जिल्हा परिषद पुणे माहिती अर्जावर विहित मुदतीत काहीही कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार रुपये २५०००/- इतकी शास्ती का करु नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून १५ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी वरील आदेशाची विहीत कालावधीत अंमलबजावणी सुनिश्चीत करावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5901/2024 दिनांक - 15/10/2024

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित</u>

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.

सदर आदेशाची प्रत सबंधितास बजावून पोच आयोगास सादर करावी.